38

उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय,मुंबई-४०००३२.
दिनांक:- १.४.२००२.

## अधिसूचना

मुंबई विद्युत शुल्क अधिनियम,१९५८.

क्रमांक:इएलडी २००२/सीआर ७२३२/ऊर्जा-६ -- मुंबई विद्युत शुल्क अधिनियम,१९५८ (१९५८ चा मुंबई अधिनियम ४०) याच्या अनुसूचीतील भाग अ,ब, क,फ आणि ग अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा आणि या संदर्भात त्यास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकाराचा वापर करुन आणि शासन अधिसूचना, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग क्र.इएलडी २०००/ सीआर १०२२२ (१)/ऊर्जा-१ दिनांक १ एप्रिल ,२००० चे अधिक्रमण करुन महाराष्ट्र शासन याव्दारे एप्रिल २००२ या बिलींग महिन्यापासून या सोबतच्या सारणीच्या (टेबल) स्तंभ २ येथे नमूद केलेल्या वीज वापरासाठी उक्त सारणीच्या (टेबल) स्तंभ ३ येथे नमूद केलेले विद्युत शुल्काचे दर विनिर्दिष्ट करीत आहे.

सारणी (टेबल)

| अ.क्र. | वीज वापरासाठी , अधिनियमाच्या परिशिष्टातील लागू असलेला भाग | विद्युत शुल्काचे दर |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| अ) | भाग-अ | वापर आकाराच्या दहा टक्के |
| ब) | भाग-ब | वापर आकाराच्या बारा टक्के |
| क) | भाग-क | वापर आकाराच्या आठ टक्के |
| ड) | भाग-फ | वापर आकाराच्या सहा टक्के |
| इ) | भाग-ग | तीस पैसे प्रति युनिट. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्र.बा. पाटील,
शासनाचे उप सचिव

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय,चर्नीरोड,मुंबई यांना विनंती करण्यात येते की,सदर पुरक पत्रक महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्र भाग-४ व मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या १०० प्रती या विभागास पाठवाव्यात.

(प्र.बा. पाटील)
शासनाचे उप सचिव

कृ.मा.प.

CR72322002Not(2)003.